# शास्त्रीय बालशिक्षणाचे सार्वत्रिकीकरण

महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेचे 'बालशिक्षण संशोधन व विकास केंद्र आणि महाराष्ट्र ज्ञानमहामंडळ या दोन संस्था एकत्र येऊन, बालशिक्षणाचे पायाभूत महत्त्व जाणून, देशासाठीशास्त्रीय, दर्जेदार बालशिक्षणाची मुक्त व्यवस्था, तरल विद्यापीठाच्या स्वरूपात "बालशिक्षणअकादमी" च्या रूपाने अस्तित्वात आणण्याची योजना आखत आहे. बालवय ही माणसाच्याआयुष्याची सुरूवात म्हणून त्याच्या जीवनास पायाभूत अशी आहे. तर या वयातील शिक्षण,म्हणजे बालशिक्षण, आज जरी देशात विस्कळित स्वरूपात असले तरी ते महत्त्वाचे आणिम्हणून अत्यंत शास्त्रशुध्द असले पाहिजे, अशी या दोन्ही संस्थांची भूमिका आहे.

**बालवयाचे महत्त्व**

बालशिक्षण म्हणजे सामान्यत: सहा वर्षाच्या आतल्या मुलांचे शिक्षण. माँटेसोरी बाईंनीबालशिक्षणाचे वय सात वर्षापर्यंतचे मानले होते. जीन पियाजे या प्रसिध्द स्वीसमानसशास्त्रज्ञाने वयाच्या दोन ते सात वर्षापर्यंतचा काल हा ‘कार्यपूर्वकाल' म्हणून महत्त्वाचामानला आहे. पियोजेने असेही दाखवून दिले होते की, सात-आठ वर्षापर्यंतचे मूल हे प्रौढांपेक्षागुणात्मकदृष्टया वेगळे असते. म्हणजे, लहान मूल हे प्रौढाची लहानशी प्रतिकृती नसते, त्यावयाच्या शारीरिक-मानसिक गरजा आणि बौध्दिक विकास प्रक्रिया व त्यातील तार्किकता हीप्रौढांपेक्षा अगदीच भिन्न असते. त्यामुळे प्रौढांनी, आपल्यासारखेच हे मूल वागेल अशी अपेक्षाकरू नये किंवा आपल्याच तर्कपध्दतीनुसार लहान बालकाला वागायला भाग पाडू नये.

बालशिक्षणाच्या संदर्भात, मेंदुविषयीची एक माहिती खूप उपयुक्त ठरणारी आहे. माणसाच्यामेंदूत चालणारे सर्व कार्य मेंदूमधील लाखो पेशी करीत असतात. मानवी कार्यासाठी, या पंशींचेपरस्परांना जोडणारे भक्कम जाळे तयार व्हावे लागते. या जाळे-बांधणीच्या बाबतीत इतर सर्वप्राण्यांपेक्षा मनुष्यप्राणी वेगळा आहे. इतर प्राण्यांच्या आयुष्यभर चालणा-या सर्वच कार्यांसाठीलागणारी मेंदूची तयारी, म्हणजे ही न्यूरॉन्सची जाळी जन्मापूर्वीच तयार झालेली असतात.त्यामुळे, आपल्याला असे आढळून येते की, इतर प्राण्यांची पिल्ले अल्प काळात स्वावलंबीहोतात. परंतु माणसाचे तसे नसते. माणसाच्या बाळाच्या मेंदूमधील पेशींची होणारी बांधणी हीजन्मपूर्व कालात म्हणजे गर्भरूपात असताना, पूर्ण झालेली नसते. जन्मापूर्वी ती फारच थोडीझालेली असते, आणि प्रत्यक्ष हे पेशींचे जाळे वयाच्या आठव्या वर्षापर्यंत तयार होत असते.म्हणूनच आपल्याला असे आढळून

येते की, माणसाचे मूल हे दीर्घकालपर्यंत, म्हणजेच वयाच्यासातव्या-आठव्या वयापर्यंत ब-याच प्रमाणात परावलंबी असते. जन्मापासून ते या वयापर्यंत तेपरावलंबित्व हळूहळू कमी होते. मूल अनेक शारीरिक, मानसिक, बौध्दिक क्रियांच्या बाबतीतस्वावलंबी होत जाते. त्यामुळे आता वयाच्या आठव्या वर्षापर्यतचे वय हे आपण बालशिक्षणाचेवय मानायला हरकत नाही. हा सर्व बालकांचा माणूस म्हणून होणा-या घडणीचा काल असतो,असेही लक्षात येईल. बालकाचे सामान्यत: आठ वर्षांपर्यंतचे वय हे फार नाजूक असे वयअसते. शारीरिक, मानसिक, बौध्दिक असे कोणतेही आघात सोसण्याचे हे वय नसते. आजच्यातथाकथित शिक्षणाचे,म्हणजे कोणीतरी समोर बसवून शिकविण्याचे, फार मोठे ताण सोसण्याचेहे वय नसते. प्रौढांच्या तार्किकतेने वागण्याचे हे वय नसते. आठ वर्षापर्यंतचे बालकाचे वय हेआपणहून शिकण्याचे वय असते. मूल आपले आपण आणि अतिशय वेगाने शिकत असते.स्वयंशिक्षण करीत असते. आपले आपणच शिकण्याच्या प्रेरणा, लहान बालकाला उपजतचअसतात. आणि स्वयंशिक्षणाची कौशल्येही त्याला किंवा तिला निसर्गत:च प्राप्त झालेलीअसतात. बालमानसशास्त्रात सिध्द झाले आहे की जन्मल्यापासूनच बालकाचे शिकणे, म्हणजेचआजुबाजूच्या जगाचे आकलन करून घेणे चालू होत असते. आठ वर्षापर्यंतच्या वयाचे वैशिष्टयअसे की, ही शिक्षणप्रक्रिया अतिशय वेगाने व सातत्याने चाललेली असते. त्यामुळे बालकाच्याया स्वयंशिक्षणाच्या प्रयत्नांना पूरक असे वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी बालकाच्याआजुबाजूच्या प्रौढांना घ्यावी लागते.

आधुनिक भाषेत आपण बालशिक्षणाच्या वयाची एक वेगळी व्याख्या करू शकू. आपण आताअसे म्हणू की," मेंदूतील चेतापेशींच्या बांधणीचे, म्हणजेच क्षमतानिर्मितीचे वय म्हणजेबालशिक्षणाचे वय होय. " साहजिकच बालशिक्षणाचा या वयातील सारा व्यवहार हा मेंदूवाढीलाअभिमुख असाच असावा लागेल. मेंदू वाढीला उपयुक्त अशा विविधांगी गोष्टी बालशिक्षणात(आणि प्राथमिक शिक्षणातही) प्रवेश करतील. बालकांशी संबंधित प्रौढ व्यक्तींनी शैक्षणिकआशय विचारांत घऊनच, त्यांच्याशी असलेली आपली घरची वागणूक ठरविली पाहिजे.

विशेषत: हे लक्षात घेतले पाहिजे की, मेंदू घडणीचे वय हे खूप नाजूक वय असते, संवेदनशीलवय असते. या वयात कोणत्याही प्रकारची वागणुकीची किंवा अपेक्षांची घिसाडघाई उपयोगीनाही. मुलांमध्ये विशिष्ट क्षमता निर्माण होण्यापूर्वीच त्यांच्यावर अपेक्षांचा नि विशिष्ट शैक्षणिककृतींचा ताण ठेवल्यास मेंदूघडणीच्या कामातच अडथळा निर्माण होतो. अशी मुले, नेमक्यात्याच क्षमतांच्या बाबतीत दुबळी राहण्याचा संभव अधिक असतो. त्यामुळे, विशिष्ट क्षमतांच्यासंदर्भातील चेतापेशींची भक्कमपणे जोडणी होण्यापूर्वीच त्या क्षमतांना घाईघाईने नि दडपणानेकामास लावले तर आपण मुलाला शिक्षण देत नाही तर त्याच्या शिक्षणाच्या संधीच हिरावूनघेत आहोत असे होईल. पालक, शिक्षक आणि शिक्षणसंस्था यांनी याबाबतीत सजग राहण्याचीगरज आहे.

मेंदू अधारित शिक्षणाची वाट चोखाळणा-यांना आणखीही एका गोष्टीचे भान ठेवायचे आहे.अलीकडे तंत्रज्ञानातील क्रांतीने ज्ञानाच्या नि करमणुकीच्या क्षेत्रात अनेक नवनवीन साधने आलीआहेत. टी. व्ही., संगणक, मोबाईल अशा अनेक साधनांना मुले सामोरी जाताहेत. सुशिक्षितसधन पालकांची तर मनोवृत्ती अशी झालेली आहे की, या सर्व तंत्राचे शिक्षण मुलांना शाळांतूनमिळावे आणि तेही शक्य तितक्या लहान वयापासून. तंत्रांचे अनुभव हे कौशल्यांचे अनुभवअसतात, ती तंत्रे शिकणे, आत्मसात करणे फारसे कठीण नसते. ते कोणत्याही वयाला येऊशकते. त्यामुळे त्याच्या शिकण्याचा अट्टाहास बालशिक्षणाच्या वयात करू नये. किंबहुना,त्यांचा समावेश बालशिक्षणात करणे हे मेंदूविरोधी कृत्यच ठरते. कारण, संगणकासारख्या किंवाटीव्हीसारख्या तंत्रांचा करमणुकीसाठी काय किंवा अगदी ज्ञानसाधनेसाठी काय तो कृतिशीलअनुभव नसल्यामुळे निरूपयोगी आणि प्रसंगी घातकच ठरतो. मुलांना निसर्गत:च एका जागीखिळून बसणे जमत नसते, अशा वेळी बाह्ल आकर्षणाने दडपून बसायला भाग पाडणे हेमेंदूविकासासाठी हानिकारकच ठरते. मुले या गोष्टींपासून दूर राहणेच त्यांच्या मेंदूविकासालाआणि बौध्दिक विकासाला हितकारक आहे. बालवाडीत किंवा प्राथमिक शाळेत मुक्त अनुभवांचीगरज आहे. संगणक येथे आणणे फॅशनेबल असले तरी ते मेंदूविकासास मारक आहे हेपालकांनी, शाळांनी आणि सरकारनेही लक्षात घ्यायला हवे.

**शास्त्रीय बालशिक्षणाचे महत्त्व व परिस्थिती**

बालकाच्या नैसर्गिक प्रेरणांना नि क्षमतांना ओळखून त्याच्या स्वयंशिक्षणाच्या प्रयत्नांना पुरेसे निपूरक असे जे कार्य संबंधित व्यक्तींनी करावयाचे असते, त्याला बालशिक्षण असे म्हणता येईल.

बालकाची लहान वयात होणारी वाढ निरोगी व्हावी अशी आपली अपेक्षा असते. तशीच अपेक्षाआपण त्याच्या किंवा तिच्या शिक्षणाविषयीही धरायला हवी. शिक्षणही निरोगी असायला हवे.निरोगी शिक्षण म्हणजे बालकाचे शास्त्रीय पध्दतीने होणारे शिक्षण, ज्याला आपण "शास्त्रीयबालशिक्षण' असे म्हणू. त्याची दोन अंगे आहेत. एक आहे ते, व्यक्तिगत पातळीवर मूलसमजावून घेणे. म्हणजे, मुलाच्या नैसर्गिक क्षमता, मुलाचे मानस, मुलाच्या नैसर्गिक विकासाचीसूत्रे, निसर्गत: मूल कसे शिकते याची व्यवहारिक तत्त्वे अशा अनेक गोष्टी. या बाबी नीटसमजावून घेतल्याशिवाय मुलाचे शिक्षण आपण करतो असे म्हणण्यात काहीच अर्थ नाही.ज्यांना या गोष्टींचे आकलन नाही अशा शिक्षक शिक्षिकांच्या हातात आपली मुले पालकांनी देताकामा नये. अर्थात् पालकांनाही या गोष्टींचे आकलन असायला हवे.

बालशिक्षणाचे दुसरे अंग आहे ते म्हणजे प्रत्यक्ष बालशिक्षणाचे शास्त्र. अनेक पालकांना असेकाही बालशिक्षणाचे अतिशय विकसीत असे शास्त्र आहे, अशी कल्पना नसते. त्यामुळेत्यांच्याकडून चांगल्या म्हणजे शास्त्रीय शिक्षणाचा आग्रह शाळांकडे धरला जात नाही. शाळांनाम्हणजे व्यवस्थापक नि शिक्षक यांना शास्त्रीय शिक्षणाचे बाळकडू मिळालेले नसेल तर तेत्यांच्या शाळांतून शास्त्रीय शिक्षण देऊ शकत नाहीत. यांतून मुलाचे मात्र अपरिमित आणिअरिवर्तनीय असे नुकसान होत आहे.

अनेक देशांनी शास्त्रीय बालशिक्षणाची कांस धरून हे पिढया-पिढयांचे नुकसान टाळले आहे !

आजच्या आपल्या परिस्थितीत अनेक कुटुंबांना, अशा प्रकारे, बालकांच्या विकासाला, असाशास्त्रीय दृष्टिकोणांतून, हातभार लावायला- तोही एक जबाबदार पालक म्हणून वेळ नसतो. हेवास्तव चिंताजनक आहे. बरेचसे पालक आपली मुले पाळणाघरांतून ठेवतात. तेथे अनेक मुलेअसतील तर बालकांच्या सामाजिकतेच्या गरजा जरूर भागतील पण त्याचबरोबर, यासामाजिककीकरणाच्या प्रक्रियेविषयी शास्त्रीयतेचे ज्ञान जर पाळणाघर चालविणा-यांना नसेलतर, ज्या त-हेचे संस्कारित सामाजिकीकरण या वयात अभिप्रेत असते, ते तसे घडणार नाही.पाळणाघरे ही केवळ 'सांभाळगृहे' असतील तर ती मुलांच्या सुरक्षिततेची हमी देतील, पण तीबालकाच्या, अत्यंत निर्णायक स्वरूपाच्या वाढीच्या काळात, त्यांच्या भावी समायोजनासाठीपोषक असे वातावरण पुरविण्याची मात्र हमी देणार नाहीत.

कुटुंबे, पाळणाघरे आणि बालवाडया ही समाजनिर्मितीची केंद्रे आहेत. त्यांचे अयोग्य वातावरणहाच एक समाजातील गंभीर असा शैक्षणिक प्रश्न आहे. कारण, लहान वयातबालकाचे संपूर्ण आयुष्यच अनुभवाधारित अशा शिक्षणप्रक्रियेने व्यापलेले असते. आणि असेवातावरण सर्वतोपरी, देण्याची व्यवस्था, समाजनिर्मितीच्या या केंद्रांमधून व्हायला हवी असते.

बालकाच्या विकासाची प्रक्रिया समजावून घेणे, त्याविषयी संबंधित व्यक्तींनी जागरूक असणे,आणि समाजातील सर्वच बालकांना समानतेने विकासाच्या संपन्न संधी मिळणे, यासाठीभारतातील समाजात व्यापक

चळवळ उभी राहण्याची गरज आहे. कारण, येथे, मुलांच्याविकासात जाणीवपूर्वक लक्ष घालण्याची प्रथा अजून निर्माण झालेली नाही. बालविकास हाज्ञानधारित असावा अशी जाणीव येथे निर्माण झालेली नाही. बालविकासाची जगभर वर्षानुवर्षमान्यता पावलेली तत्त्वे ही अजूनही, व्यापक स्तरावर कुटुंबातील आणि बालशाळांतीलबालकांच्या शिक्षणाची पार्श्वभूमी म्हणून अमलांत आणली जात नाहीत. विशेषत: अतिशय वेगानेविकास होण्याचे हे वय असल्यामुळे, अगदी दर महिना"-पंधरवडयात बालकांमधील बदलजाणवत असतात. त्यामुळे, त्या त्या वयाला काय घडते हे जाणून घेऊन त्यासाठी सजगतेनेपावले उचलण्याचे काम प्रौढांना करायचे असते. विशिष्ट वयाला विशिष्ट गोष्ट करायची असते,किंवा करायची नसते, आणि याचे आकलन ही बालविकासाची तत्त्वे आपल्याला देत असतात.

बालकांना स्वत:च्या विकासक्रमात अनेक अडथळयांनाही तोंड द्यावे लागते. काही अडथळे हेबाह्य परिस्थितीतून निर्माण होतात तर काहींची कारणे, त्यांच्या मनाच्या धाग्यादो-यांशीजोडलेली असतात. अथवा कालानुरूप येणा-या असमतोलाच्या अवस्थांशी ते संबंधित असतात.कधी हे अडथळे शारीरिक स्वरूपाचे असतात तर कधी ते निव्वळ मानसिक स्तरावरीलअसतात.

इयत्ता पहिलीपासून म्हणजे वयाच्या सहाव्या वर्षापासून बालकांचे औपचारिक शिक्षण सुरू होते.या शिक्षणाच्याही पूर्वी म्हणजे वयाच्या तिस-या वर्षापासून ते थेट सहाव्या वर्षापर्यंत बालकालाऔपचारिक शिक्षण न देता, त्या औपचारिक शिक्षणाकडे जाण्याचा जो मार्ग तो तयार करूनद्यावा, अशी भूमिका अनेक शिक्षणतज्ज्ञांनी सांगितली. बालकाला असलेल्या, आणि जन्मत:चप्राप्त झालेल्या विविध क्षमतांचा विकास करण्याचे वय हे बालशिक्षणाचे वय मानले जाऊलागले. या वयातील शिक्षण कसे असावे, अनौपचारिक पध्दतींनी शिक्षण केले जावे, त्यासाठीविकासक्षम अशा वेगवेगळया शैक्षणिक साधनांचा वापर करावा, आणि बालभोग्य अशावाङ्मयाचा वापर करावा असे ठरवून, ही सर्व शिक्षणविषयक क्षेत्रे विकसित होत गेली. त्यामुळे

अशा सर्व बालसुलभ आनंददायी पध्दतींनी बालकाच्या विविध क्षमतांना पोषक असे खाद्यमिळते. त्यामुळे तर या वयात, पुढे पहिलीपासून करावयाच्या औपचारिक शिक्षणाचा आग्रहधरला तर मुलाचे शिक्षण भराभरा होत नाही, तर उलट, त्यांच्या कायमस्वरूपी क्षमताविकासातअडथळाच निर्माण होतो.

**मेंदू संशोधन व बालशिक्षण**

मेंदूविषयीचे संशोधन आणि त्याचे शैक्षणिक पर्यवसान यासंबंधीचे वाङमय भरपूर प्रमाणातउपलब्ध झाले आहे. हे वाङ्मय वरवर जरी चाळले तरी लक्षात येते ते असे की,

१. अनेक प्रयोगशील शिक्षणतज्ज्ञांनी मांडलेल्या अनेक विचारांना या संशोधनानेपुष्टी दिलेली आहे. उदाहरणार्थ, मूल आपले आपण शिकत असते, तेअनुभवांतून शिकते, ती कृतीतून शिकते इत्यादी. ही अशी तत्त्वे अगदीकोमेनिअस पासून पियाजेपर्यंत अनेक तज्ज्ञांनी गेली तीनशे वर्षे मांडलेलीआहेत. आजची मेंदूविषयीची समजही याच गोष्टी सांगत आहे.

२. शिक्षणक्षेत्रात आज प्रस्थापित झालेल्या आणि मान्यता पावलेल्या अनेकसंकल्पनांना नि प्रथांना या मेंदूविषयक नवसंशोधनांनी धक्का दिलेला आहे.उदाहरणार्थ, बुध्दिमत्तेची आनुवंशिकता, बुध्यांकाची संकल्पना किंवापरीक्षांमधून होणारे मूल्यमापन, वा शिकवून, पाठांतर करून होणारीज्ञानसाधना इत्यादींविषयी संबंधितांचा भ्रमनिरास होत चालला आहे.

३. लहान मूल कसे शिकते याबाबत आजवर उपलब्ध नसलेली नवी माहितीउपलब्ध होऊन बालकाच्या स्वयंशिक्षणाच्या प्रक्रियेवर बराच प्रकाश पडलाआहे. उदाहरणार्थ, बालकाच्या मेंदूतील पेशींचे जाळे, जन्मापूर्वी पूर्ण झालेलीनसते, तर ते सामान्यत: आठ वर्षापर्यंत बांधले जात असते. आणि हे कार्यमिळणाऱ्या अनुभवांकरवी घडत असते.

४. बालकाच्या शारीरिक, भावनिक नि बौध्दिक प्रकृतीला वेगवेगळया वयात पूरकअथवा मारक ठरणा-या बाबी कोणत्या आणि त्या अनुक्रमे कशा वाढवतायेतील व टाळता येतील, याविषयीची बरीच स्पष्टता आता झाली आहे. त्यामुळेपालकांना, शिक्षकांना नि शिक्षणसंस्थांना यांतून बरेच मार्गदर्शन मिळू शकते.

५. बालकाच्या बाबतीत विकासभिमुख शिक्षणाची तत्त्वे कोणती आणि प्रत्यक्षशिक्षण व्यवहारांत ती कोणत्या रूपांत उतरवता येतील याची ब-यापैकी समजआता येऊ शकते आहे. संपूर्ण बालवयातील शिक्षणाचा दर्जा कसा असावायाची मांडणी आता करता येऊ शकते.

६. प्रत्यक्ष वर्गात घडणा-या ( वा घडविलेल्या ) घटना आणि त्यामुळे बालकाच्यामेंदूत घडणारी ( बौध्दिक ) प्रक्रिया व त्याचे शैक्षणिक परिणाम यांविषयी सुध्दाआता आपल्याला ब-यापैकी मांडणी करता येणार आहे.

मज्जामानसशास्त्रातील या घडणा-या घटनांकडे जागरूकतेने पाहिल्यावर एक गोष्ट प्रकर्षानेजाणवत आहे ती अशी की, आता लहान मुलाकडे, शिकत असलेल्या शाळकरी मुलाकडेपाहण्याची आपली दृष्टी बदलली आहे.

एकढेच नव्हे तर या नव्या दृष्टीतून न्याहाळलेलेबालकही आता वेगळे दिसू लागले आहे. आता घरी वा शाळेत आपल्यासमोर उभे राहणारे मूल,हे या सर्व शोधांच्या आधारावर आपण समजून घेतलेले बालक म्हणून आपल्यासमोर उभेराहणार आहे. आपण आजवर मानत आले तसे अज्ञानाने गृहित धरलेले ते बालक नाही. तर

आपल्या अंतर्गत शक्तींच्या नि आपल्या आजूबाजूच्या आजवरच्या उभ्या राहिलेल्या सांस्कृतीच्याआधारे, स्वत:च जगाची ओळख करून घेणारे असे ते मूल आहे.

जगातील विविध वस्तू, नि घटनांचे आपल्या पध्दतींनी अर्थ लावणारे, नि त्याचे स्वत:पुरतेस्वतंत्र सिध्दांत बांधणारे असे ते बालक आहे. ते ज्ञाननिर्मिती करणारे शास्त्रज्ञही आहे नि तेतेवढेच प्रभावी असे निर्मितीक्षम कलावंतही आहे. खरं तर आता मूल नव्याने समजावून घेणे,हीच तर फार मोठी सामाजिक गरज आहे.

**प्रौढांची जबाबदारी**

बालकाभिमुख प्रौढ शिक्षणाचा आशयही स्थूलमानाने येथे मांडता येईल. बालकाचे मानससमजावून घेणे यात फार महत्त्वाचे. हे मानसही बालकाच्या बदलत्या वयानुसार निसर्गत:चकसकसे बदलत जाते हे जाणून घेणे अधिकच महत्त्वाचे. बालकाचा बौध्दिक विकास त्याच्याशारीरिक विकासाशी कसा संलग्न असतो, बालकाच्या भावना या त्याच्या बौध्दिक विकासाच्यावाटेवरच्या "चौकीदार' कशा असतात, आणि या संदर्भात आपली म्हणजे जवळच्या प्रौढांचीभूमिका नि वागणूक कशी असायला हवी, या सा-या समजून घेण्याच्या, शिकण्याच्या गोष्टीआहेत.

थोडक्यात असे की, मूल कसे असते, मूल कसे वाढते, मूल कसे शिकते, मूल कसे वागतेआणि मूल कसे नसते हे बालकाभिमुख प्रौढ शिक्षणाच्या अभ्यासक्रमातील महत्त्वाचे "विषय'आहेत. ज्यांचे या विषयांचे शिक्षण नीट झाले आहे अशांना आपण "सुशिक्षित' पालक असे म्हणूशकतो. मग व्यवहारात ते निरक्षर का असेनात. याउलट व्यवहारातील "सुशिक्षित' व्यक्तींतहीजर हे शिक्षण नसेल तर मुले वाढविण्याच्या क्षेत्रात त्यांना "अशिक्षित' च मानावे लागतील.आणि अशा अशिक्षितांची खूप मोठी संख्या हाच खरा आपल्या देशातील फार गंभीर असा प्रश्नआहे. हा प्रश्न गंभीर आहे कारण, तो प्रत्येक मुलाशी म्हणजेच भावी काळातील प्रत्येक प्रौढाशीआणि म्हणूनच संपूर्ण समाजाशी संबंधित असा प्रश्न आहे. प्रौढ शिक्षणाचा हा प्रधान आशयअसणार आहे.

भारतातील बालशिक्षणाची सुरूवात भारतीय बालशिक्षणाला शतकभराचा इतिहास आहे.ब्रिटनमधील 'इन्फंट स्कूल' म्हणजे बालवर्ग किंवा तत्कालीन प्रचलित बिगरीचे वर्ग, प्राथमिकपूर्व शिक्षण म्हणून भारतात रुजू झाले आणि ते अगदी 1947 सालापर्यंत चालू होते. अर्थातज्याला शास्त्रीय बालशिक्षण म्हणता येईल, असा कोणताच अंश त्यांमध्ये नव्हता. मात्र,भारतातील इंग्रजी राजवटीत, फ्रोबेलच्या किंडरगार्टन पध्दतीच्या शाळा, लॉड कर्झन यांच्याकारकीर्दीत भारतीय शाळांतून सुरू झाल्या. १८९७ ते १९०४ या काळात या शाळा, प्राथमिकपूर्व म्हणून प्राथमिक शाळेला जोडण्याचा, तसेच प्राथमिकच्या पहिल्या एक-दोन वर्षांतकिंडरगार्टन पध्दतीने शिकविण्याचा प्रयोग सरकारी पातळीवर झाला. तोही प्रवाह, पुढे वाढलेलाकिंवा टिकलेला दिसत नाही. काही ख्रिस्ती मिशनरी संस्थांमधून या पध्दतीने शिक्षण दिले जातअसे, परंतु त्याचा विस्तार मात्र झाला नाही.

किंडरगार्टन पध्दतीचा प्रसार करण्यात त्याकाळी, बडोदे संस्थान आघाडीवर होते. सयाजीरावगायकवाड यांच्या प्रगतीशील विचारांमुळे, अशा पध्दतीच्या शाळा अगदी खेडया-पाडयांतपोचविण्याचा प्रयत्न या संस्थानच्या शिक्षणखात्याने केला. विसाव्या शतकाच्या सुरूवातीचा हाकाळ होता. या काळात समाजामध्ये शिक्षणाविषयी फारशी आस्था नव्हती. बालशिक्षणाविषयीतर पूर्ण अज्ञानच होते.

विसाव्या शतकाच्या सुरूवातीला युरोपात इटलीमध्ये, मॉन्टेसॉरीबाईंची पहिली शाळा १९०७ साली सुरू झाली. मांटेसॉरीबाईंनी, या शाळेत अत्यंत प्रभावी पध्दतीने, मानसशास्त्राच्या आधारेआणि बालकांबरोबर राहून त्यांच्या अवलोकनाद्वारे, शिक्षणविषयक प्रयोग केले, आणि प्रयोगांतूनसिध्द होत गेलेल्या शिक्षणपध्दतींविषयी लेखन केले. मूळ इटालियन भाषेत लिहिलेली त्यांचीपुस्तके १९१२ साली इंग्रजीत अनुवादीत झाली. या पुस्तकांचा सा-या युरोपमध्ये वेगाने प्रसारझाला. याच सुमारास भारतातही ही पुस्तके उपलब्ध झाली. बडोदे संस्थान बालशिक्षणाच्याबाबतीत आघाडीवर होतेच. यातील वसो या संस्थानचे 'दरबार' गोपाळदास नावाचे गृहस्थहोते. राष्ट्रीय चळवळीतही ते या प्रदेशात आघाडीवर होते. आपल्या अधिकारात ते बडोदेसंस्थानच्या शिक्षणात नवे नवे प्रयोग करीत असत. त्यांच्या हाती माँटेसोरीबाईंची इंग्रजी पुस्तकेनि साधने पडून, गोपाळदास यांनी, वसो या आपल्या गावी, प्रत्यक्ष माँटेसोरी पध्दतीच्याशाळेचा प्रयोग हाती घेतला. याचवेळी मोतीलाल अमीन या शिक्षणक्षेत्रातील तज्ज्ञाने त्यांना साथदेऊन, माँटेसोरी पध्दतीच्या शाळांच्या प्रसारास प्रोत्साहन दिले.

गुजरातमध्ये अशा त-हेने मॉन्टेसोरी पध्दतीवर आधारित असे बालशिक्षण रुजू लागले.लोकांच्यात या पध्दतीविषयी निर्माण झालेली उत्सुकता जोखून, छोटेलाल बापूजी पुराणी यांनी 'मॉन्टेसोरी मेथड' या पुस्तकाचे गुजराती भाषेत भाषांतर करून प्रसिध्द केले. माँटेसोरी बाईंचेविचार प्रस्तृत व्हायला याची खूप मदत झाली.

माँटेसोरी पध्दतीच्या शिक्षणाच्या प्रसारात, थिऑसॉफिल सोसायटीच्या प्रमुखपदी असलेल्या डॉ.ॲनी बेझंट यांचेही योगदान उल्लेखनीय होते. थिऑसॉफिकल सोसायटीच्या शाखांकरवी विविधठिकाणी शिक्षणसंस्था निर्माण करून, त्यात शास्त्रीय बालशिक्षणाला विशेष स्थान त्यांनी दिले.

या शाळा चालविण्यासाठी, बेझंटबाईंनी, मुद्दाम युरोपातून प्रशिक्षित शिक्षिका आणल्या होत्या.गुजरातेत माँटेसोरीबाईंच्या विचारांचा प्रसार ब-यापैकी होऊ लागला होता. अहमदाबाद येथीलप्रसिध्द कापड गिरणी मालक अंबालाल साराभाई यांच्या पत्नी सरलादेवी साराभाई यांनीआपल्या लहानग्या मुलांचे माँटेसोरी पध्दतीने शिक्षण व्हावे म्हणून, खास इंग्लंडमधून माँटेसोरीप्रशिक्षित शिक्षिका आणून त्यांच्या मदतीने आपल्या मुलांचे शिक्षण केले. भारतातील प्रसिध्दअणुशास्त्रज्ञ विक्रम साराभाई हे या मुलांपैकीच एक होते. सरलादेवी साराभाई यांचेबालशिक्षणविषयक कार्य हे अर्थातच या घरगुती प्रयोगापुरते मर्यादित राहिलेले नाही. गिजुभाई

बधेका आणि ताराबाई मोडक यांनी, जेव्हा, "माँटेसोरी शिक्षणसंघ ' स्थापन करण्याचा घाटघातला तेव्हा, सरलादेवींचे बळकट हात त्यांच्यामागे उभे राहिले. याच माँटेसोरी संघाचे, पुढे 'नूतन बाल शिक्षण संधा' त रुपांतर झाले. अक्षरश: तन, मन आणि धनाने त्यांनी या संस्थेच्याविकासाला हातभार लावला. आपल्या आयुष्याच्या अखरेपर्यंत, त्यांनी या संस्थेच्या अध्यक्षपदाचाभार पेलला.

सरलादेवी साराभाई यांच्या आणखी एका बालशिक्षणविषयक कार्याचा उल्लेख करायला हवा.महात्मा गांधींनी १९३७ साली "बुनियादी शिक्षणा' चा विचार देशापुढे ठेवला. त्याचे प्रयोगहीदेशात, प्रांतोप्रांती, सुरू झाले. बुनियादी शिक्षण हे सात ते चौदा या वयातील मुलांचे शिक्षणहोते. पुढे १९४२ च्या स्वातंत्र्य लढयात अटक होऊन गांधीजींना पुण्यात आगाखानपॅलेसमध्ये स्थानबध्द करून ठेवण्यात आले होते. १९४४ च्या नोव्हेंबरमध्ये त्यांची तेथून सुटकाझाली. स्थानबध्दतेत असताना ते "नयी तालीम'चा म्हणजे आपण दिलेल्या

बुनियादीपध्दतीच्या "नवीन शिक्षणा' चा सखोल विचार करीत होते. बाहेर येताच त्यांनी संपूर्णजीवनशिक्षणाचा विचार लोकांपुढे मांडला. त्यात बुनियादी शिक्षणाच्या पूर्वीच्या म्हणून ‘पूर्वबुनियादी' शिक्षणाला अनिवार्य स्थान देण्यात आले.

शिक्षणाची पूर्वबुनियादी सविस्तर योजना तयार करण्याच्या कामासाठी एक समिती नियुक्तकरण्यात आली. या समितीचे अध्यक्षस्थान सरलादेवी साराभाईं यांना देण्यात आले. संपूर्णपूर्वबुनियादी शिक्षणाची रचना करण्याचे हे काम होते. काम अवघड होते, कारण, गांधीजींनीदिलेला बुनियादी शिक्षणाचा विचार आणि मानसशास्त्रावर आधारित माँटेसोरीप्रणितशिक्षणपध्दती यांचा परस्परांशी मेळ घालण्याचे हे काम होते. सरलादेवींनी इतर सहका-यांच्यामदतीने त्या कार्यात चांगले योगदान दिले.

महाराष्ट्रात, फ्रोबेलच्या किंडरगार्टन पध्दतीचा काही प्रमाणात प्रयत्न, सरकारी पुढाकाराने,विसाव्या शतकाच्या सुरूवातीसच झाला होता. परंतु तो अल्पकाळच टिकला. त्यानंतर माँटेसोरीतत्त्वांवर आधारित अशी शाळा काढण्याचा पहिला प्रयत्न हा प्रा. के. रा. कानिटकर यांनीकेलेला आहे. माँटेसोरी वाङ्मयाचा अभ्यास केल्यानंतर त्यांनी इ. स. १९२२ मध्ये पुण्याच्यारमणबाग शाळेत या धर्तीची शाळा उघडली. त्यासाठी खास विलायतेहून त्यांनी माँटेसोरींचीसाधने व वाङ्मय मागवून घेतले होते.

सौराष्ट्रात भावनगरलाही याच सुमारास, बालशिक्षण क्षेत्रात काही घडू पाहत होते. नानाभाईभट्ट यांनी ‘दक्षिणामूर्ती' संस्था स्थापन करून, खेडयांतून भावनगरमध्ये शिक्षणासाठी येणा-यामुलांसाठी वसतीगृह चालविले. चांगल्या मुलांचे संस्कार या मुलांबर करावेत असा हेतू त्यामागेहोता. याच संस्थेत मुख्य शिक्षक म्हणून गिजुभाई बधेका, १९१६ साली रूजू झाले. इथपासूनगिजुभाईंची शिक्षणविषयक कारकीर्द सुरू झाली.

भारतातील बालशिक्षणाच्या क्षेत्रातील आणखी एक महत्त्वाची ऐतिहासिक घटना म्हणजे प्रत्यक्षमाँटेसोरी बाईंचे भारतात झालेले आगमन. थिऑसॉफिकल सोसायटीचे तत्कालीन अध्यक्ष डॉ.अरूंडेल व त्याच्या पत्नी रूक्मिणीदेवी यांच्या आमंत्रणावरून, १९३९ सालच्या डिसेंबरमहिन्यात, माँटेसोरीबाई भारतात आल्या. लगोलग दुसरे महायुध्द सुरू झाले आणि माँटेसोरींनाआपल्या मायदेशी, म्हणजे इटालीमध्ये परतणे शक्य झाले नाही. भारतात ब्रिटनचे राज्य आणिइटली हे ब्रिटनचे शत्रूराष्ट्र आणि खुद्द माँटेसोरीबाई इटालियन असल्यामुळे

त्यांना येथे मद्रासव कोडाईकनाल येथे स्थानबध्द होऊन राहावे लागेल.अर्थात ब्रिटिशसरकारला व्यक्तिश:माँटेसोरीबाईंचे शिक्षणातील कर्तृत्व माहीत होते. त्यामुळे त्यांना येथे राजकीय कारणांमुळेकोणताही त्रास सोसावा लागला नाही. उलट त्यांच्यावरची सर्व बंधने सैल करून त्यांनाआपल्या शिक्षणविषयक तत्त्वांचा प्रसार करण्याची आणि त्यासाठी ठिकठिकाणी प्रशिक्षणवर्गचालविण्याची मुभा देण्यात आली.

माँटेसॉरीबाईंचे पुढे सुमारे दहा वर्षे भारतात वास्तव्य झाले. या काळात त्यांनी देशभरवेगवेगळया ठिकाणी बारा दीर्घमुदतीचे माँटेसॉरी शिक्षणाचे प्रशिक्षण वर्ग स्वत: घेतले. सुमारेअकराशे व्यक्तींना त्यांनी, आपल्या पध्दतीच्या बालशिक्षणात प्रशिक्षित केले. महाराष्ट्र आणिगुजरातमधील अनेकांनी या वर्गांचा लाभ घेतला. याच काळात माँटेसोरीबाईंनी आपल्याचभाषणांच्या आधारे "ॲबसॉर्बंट माईंड' या महत्त्वाच्या पुस्तकाचे लेखन केले. माँटेसोरीबाईंचे हेअखेरचे पुस्तक खूपच गाजले. मूल समजावून घेण्याची गुरूकिल्लीच या पुस्तकाने दिली आहे.

माँटेसोरींनी प्रत्यक्षात १९४९ सालच्या एप्रिल महिन्यात भारताचा किनारा सोडला व त्यामायदेशी परत गेल्या. त्यानंतर, त्यांनी, आपण भारतात केलेल्या कार्याचा विस्तार करण्यासाठी,आंतरराष्ट्रीय माँटेसोरी संघाकडून, ए. एम. ज्यूस्टन यांची नेमणूक केली. पुढे अनेक वर्षे यांनीभारतात माँटेसोरी शिक्षणपध्दतीच्या प्रसारात वाहून घेतले.

या साऱ्या घटनांचा परिणाम होऊन भारतात माँटेसोरी शिक्षणाचा ब-यापैकी प्रसार, भारताच्यास्वातंत्र्यपूर्व कालात झाला. अनेक ठिकाणी, विशषत: शहरी भागांतून आणि त्यांतही समाजातीलसबल अर्थिक वर्गात या शिक्षणाने चांगलेच मूळ धरले. या प्रसार कार्यात सिंहाचा वाटा होता तोगिजुभाई बधेका आणि ताराबाई मोडक यांनी स्थापन केलेल्या "नूतन बाल शिक्षण संघा' चा.

**प्रश्नांकडून उत्तराकडे**

आपले प्रश्न ओळखणे, प्रश्नांना विचारपूर्वक सामोरे जाणे आणि प्रश्नांच्या सोडवणुकीचीवाटचाल करणे, हे कोणत्याही समाजगटाच्या जिवंतपणाचे लक्षण आहे.

गेल्या शतकभराचा, बालशिक्षणाचा भारतातील इतिहास असे सांगतो की, आपण बालशिक्षणाचेप्रश्न नेमकेपणाने ओळखले आहेत. काही प्रमाणात त्या प्रश्नांना विचारपूर्वक सामोरे जाण्याचाआणि या प्रश्नाच्या सोडवणुकीची वाटचाल करण्याचा प्रयत्न, बाल शिक्षणातील आद्यशिक्षणतज्ज्ञांनी यापूर्वी केला आहे. बालशिक्षणाचे एक आंदोलनच या मंडळींनी आपल्या काळातउभे केले. त्याने, बालशिक्षण देशभरात ओळखीचे झाले. परंतु प्रत्यक्ष शास्त्रीय बालशिक्षणाच्यासार्वत्रिकरणाचे काम मात्र, त्यांच्या काळाच्या मर्यादेत होऊ शकले नाही.

**महाराष्ट्र बालशिक्षण परिषद**

महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेच्या स्थापनेने, निदान महाराष्ट्रात तरी 'शास्त्रीय बालशिक्षणाच्यासार्वत्रिकरणा'चे ध्येय समोर ठेवून, बालशिक्षणाच्या दुस-या किंवा नव्या आंदोलनाची सुरूवातझाली आहे.

मानवाच्या आयुष्यातील अत्यंत महत्वाचा काळ, म्हणजे बालशिक्षणाचा सहा वर्षापर्यंतचा. परंतुहेच शिक्षण भारतात अत्यंत दुर्लक्षित, विस्कळित, अशास्त्रीय, असुरक्षित असे होते आहे. शिक्षणशास्त्रीय पध्दतीने, बालकेंद्री, आनंदमय व्हावे यासाठी बालशिक्षण प्रेमींनी एकत्र येऊन सुरूकेलेले आंदोलन म्हणजेच, महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेचे नवे आदोलन आहे. देशव्यापीसंघटना उभी राहण्याची ही पहिली पायरी आहे.

**या संस्थेची उद्दिष्टे पुढील प्रमाणे आहेत :**

१. बालशिक्षण क्षेत्राच्या शास्त्रीयतेच्या दिशेने आंदोलन चालवणे.

२. बालशिक्षणविषयक संशोधन संस्था, प्रयोगशाळा उभ्या करणे, प्रयोग करणे.

३. शैक्षणिक साधनांच्या निर्मितीसाठी प्रोत्साहन देणे. विशेषत: गरीब, मागासलेल्याविभागातील मुलांसाठी अल्पखर्ची परंतु टिकाऊ साधने उपलब्ध व्हावीत यासाठी प्रयत्नकरणे.

४. बालशिक्षणाच्या संदर्भात भाषणे, कार्यशाळा, चर्चासत्रे, अधिवेशने, प्रदर्शने, अभ्यासवर्गयांचे आयोजन करून त्याकरवी प्रबोधन, शिक्षण, प्रशिक्षण करणे.

५. बालशिक्षणविषयक शिक्षण-प्रशिक्षण संस्था चालवणे. अशा संस्थांना सहाय्य करणे.ग्रंथालये उभी करणे.

६. बालशिक्षणविषयक सिध्दांताचा प्रचार करणे, सैध्दांतिक आणि व्यावहारिक बालशिक्षणसंशोधन करणे, संशोधनास सहाय्य करणे.

७. बालशिक्षणविषयक माहिती जमवणे, प्रसिध्द करणे, तिचा प्रसार, प्रचार, विस्तार करणे.

८. बालशिक्षणविषयक धोरण ठरविण्यास, कायदे करण्यास शासनास सुचवणे, आणिसहाय्य करणे.

**बालशिक्षण संशोधन व विकासकेंद्र**

महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेच्या स्थापना-अधिवेशनातच ‘बालशिक्षण संशोधन व विकास केंद्र'निर्माण करावे यासाठी ठराव करण्यात आला. लगोलग त्याची निर्मितीही करण्यात आली. १५ नोव्हेंबर, १९९५ला, प्रसिध्द शिक्षणतज्ज्ञ डॉ. वि. गो. कुलकर्णी यांच्या हस्ते या केंद्राचेऔपचारीक उद्घाटन झाले.

आजवर, या केंद्राने अनेक उपक्रम, बालशिक्षणाच्या विकास-विस्तारासाठी केले. अभ्यासगटचालविणे, बालवाडीचा शिक्षणक्रम व बालवाडी प्रशिक्षणाचा विकासाभिमुख शिक्षणक्रम तयारकरणे, संदर्भ ग्रंथालय उभे करणे, बालशिक्षण-नेतृत्व निर्मितीसाठी अभ्यास-शिबिरे आयोजितकरणे, बालशिक्षणात कार्य करणा-या संस्थांचे नमुना अभ्यास करणे, अनेक पुस्तिका प्रकाशितकरणे आणि अगदी अलीकडचे काम म्हणजे, महाराष्ट्र ज्ञानमहामंडळाच्या सहाय्याने ‘नवशिक्षणाचे विश्व' या नावाने, ई-मासिक चालविणे, असे अनेक उपक्रम, या केंद्रकडूनचालविले गेले. परंतु याच काळात, परिषदेचा आणि या संशोधन केंद्राचा आढावा घेताना, असेलक्षात आले की, बालशिक्षण या विषयाच्या सर्वांगांना भिडण्याचा प्रयत्न जरी झाले असले, तरीबालशिक्षणाच्या सामाजिक गरजेचा विचार करता हे प्रयत्न निखालसपणे अपुरेच आहेत.विशेषत: शास्त्रशुध्द बालशिक्षणाचा प्रचार-प्रसार आणि ज्ञानविस्तार ज्या व्यापक स्तरावरव्हायला हवा आहे तेवढा तो करण्यात परिषदेचे प्रयत्नअपुरेच पडताहेत, महाराष्ट्रासारखे एक राज्य जरी डोळयांसमोर ठेवले तरी बालशिक्षणाचीगरज असणा-या सहा-आठ वर्षांपर्यंतच्या मुलांची संख्या दोन-अडीच कोटींच्या घरात असेल.

चार-पाच कोटी पालकांना बालशिक्षणाच्या महत्त्वाची नि त्याच्या शास्त्रीयतेची जाणीव निर्माणव्हायला हवी आहे. विविध ठिकाणी, तुटकपणे, वेगवेगळया कालमानाच्या प्रशिक्षणातून घडणारी, दीड-दोन लाख शिक्षिकांची पिढी फारच अपु-या आकलनाने आणि साधनांनी मुलांच्याशिक्षणाला भिडत आहे. शासकीय स्तरावर बालशिक्षण हा विषय जवळजवळ दुर्लक्षितच आहे.अशा परिस्थितीवर मात करायची झाल्यास परिषदेच्या कार्याचा व्याप आज आहे त्याच्या किमानहजारपट तरी वाढवायला हवा. अर्थातच हे काम केवळ उपलब्ध असलेल्या मानवी श्रमाने होणेकेवळ अशक्यच आहे. बालशिक्षण या नव्याने पुढे येत असलेल्या ज्ञानक्षेत्रात नेतृत्व देणा-याकार्यकर्त्यांचा वर्ग विस्तारला गेला पाहिजेच पण, त्याच्या हाती प्रसारासाठी नवतंत्रज्ञानाचीहीजोड दिली पाहिजे. आजच्या संगणक युगात, या विकासक अशा नवतंत्रज्ञानाच्या साहाय्यानेज्ञानप्रसाराची व्याप्ती वाढवून ज्ञानमुक्तीच्या मार्गाने जाणे सहज शक्य होणार आहे.

बालशिक्षणाच्या क्षेत्रात ही क्रांती घडवून आणणे हे आपले काम आहे. हीच आपल्या इथूनपुढच्या कार्याची एक नवी दिशा असणार आहे.

'शास्त्रीय बालशिक्षणाचे सार्वत्रिकीकरण' हे आपले ध्येय आहे. हे ध्येय आणि बालशिक्षणाचाशास्त्रीय आशय घेऊन परिषद पुढे आली आहे आणि तिची महाराष्ट्रभर, आणि पुढे देशभरव्याप्ती वाढविण्यासाठी आवश्यक ते तंत्रज्ञान आणि व्यवस्थापनज्ञान घेऊन महाराष्ट्र ज्ञानमहामंडळ पुढे सरसावले आहे. या दोन बलाढय संस्थांच्या युतीतून एक नवे कार्य,बालशिक्षणाचे विद्यापीठ, बालशिक्षणाची अकादमी उभी करण्याचा मानस आहे.

❖